अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com शुक्रवार दि. ९ डिसेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ७३ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## शेळगाव येथे ट्रकच्या धडकेने मोटारीतील दोघे ठार

✔ सुराज्य/सोलापूर

बार्शी ते सोलापूर रोडवरील शेळगाव जवळ ट्रक आणि वॅगनर मोटारीचा भयंकर अपघात होऊन मोटारीतील दोघेजण ठार तर एक जखमी झाला. हा अपघात गुरुवारी पहाटेच्या सुमारास घडला.

अपघातामधील सर्वजण सांगलीचे राहणार असून ते बार्शी येथे लग्नकार्य आटपून सोलापूरकडे निघाले होते. अमित अशोक कोथळे (वय३४ रा.भारत नगर, सांगली) आणि रघुनाथ भागवत डोरले (वय ३५ रा.दत्त चौक, सांगली) अशी मयताची नावे आहेत. याबाबत सांगली येथील रघुनाथ डोरले, अमित कोथळे आणी देशमुख असे तिघेजण बार्शी परिसरातील एका गावात लग्नासाठी आले होते.लग्न उरकून ते सर्व एमएच१२-एलजे-७०४५ या मोटारीतून सोलापूर मार्गे सांगलीकडे निघाले होते. सोलापूर होऊन शेळगाव मार्गे धामणगाव कडे येत असताना पहाटे अडींच वाजेच्या सुमारास समोरून एमएच-११-एएल-७००९ या क्रमांकाचा ट्रक धडकल्याने हा अपघात घडला. अपघातानंतर दोन्ही मृतदेह सोलापुरातील शासकिय रुग्णालयाकडे नेण्यात आले. या अपघाताची नोंद वैराग पोलिसात झाली असून सचिन मुंडे पुढील तपास करीत आहेत.




## मंद्रूप एमआयडीसीचे आंदोलन चिघळले

# शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घुसवली जनावरे

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यात मंद्रूप हद्दीतील बागायती शेतजमीन एमआयडीसीसाठी अधिग्रहण करण्यास शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असताना सातबारावर एमआयडीचा बोजा लावल्याने शेतजमीन गेलेले शेतकरी गुरूवारी आक्रमक झाले. आंदोलन चालू असताना प्रशासन व लोकप्रतिनिधी हे दखल घेत नाही हे पाहून सामाजिक संघटनेच्या मदतीने आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात जनावरे घुसवली आणि ठिय्या मारला. जो पर्यंत क्षेत्र वगळे जात नाही, तोपर्यंत उठणार नाही, अशी भूमिका घेतल्याने वातावरण पेटले.



शेतकऱ्यांनी आंदोलन स्थळी मात्र भाकर चटणी निषेध नोंदवला. या आंदोलनामुळे जिल्हाधिकारी कार्यालयास छावणीचे स्वरूप आले होते. या आंदोलनाची धग मंत्रालयापर्यंत गेली असून एक महिन्यात संपादित क्षेत्र वगळण्याच्या हालचाली चालू आहेत. मंद्रूप एमआयडीसीसाठी १४९ शेतकऱ्यांची बागायती शेत जमीन संपादित केल्या आहे. जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध आहे. त्यासाठी गेली तीन वर्ष झाली त्या विरोधात शासन दरबारी लढा उभारला आहे. मात्र प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी त्याची दखल घेतली नाही.त्याच्या निषेधार्थ गेली ८२ दिवस झाले, शेतकऱ्यांनी ग्रामपंचायती समोर आंदोलन चालू केले आहे. शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांची बाजू घेत गुरूवारी अचानक जनावरे घेऊन थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठले.

दुपारी चालू झालेले आंदोलन रात्रीउशिरा पर्यंत चालू होते. शेतकऱ्यांनी आंदोलन स्थळीच चटणी भाकर खाऊन दिवस काढला. आंदोलनाची दाखल घेत जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून तातडीने बैठक घेऊन हा विषय गांभीर्यपूर्वक घेऊन सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आदेश दिले. एमआयडीसीच्या मुंबई विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. तसे लेखी आश्वासन मिळाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालातील आंदोलन स्थगित करण्यात आले मात्र मंद्रूप मधील आंदोलन शेतकऱ्यांनी सुरूच ठेवले.

### आंदोलनाची धग मंत्रालयातपर्यंत

जिल्हाधिकारी कार्यालयातील आंदोलनाची दखल आ. बच्चू कडू यांनी घेत ही धग मंत्रालयापर्यत पोहचवली. यासाठी २२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता भू-निवड समिती सोलापूर दौऱ्यावर येणार आहे. जमिनीची पाहणी करून पाहणी अहवाल प्रधान सचिव यांना सादर केला जाणार आहे. त्यानंतर जे क्षेत्र कमी करण्यात येणार आहे. त्याची अधिसूचना काढत जाहीर प्रसिध्दीकरण केल्यानंतर उद्योग मंत्र्यांकडून क्षेत्र वगळल्याचे परिपत्रक काढले जाणार आहे. यासाठी एक महिन्याचा कालावधी लागणार आहे.

संपादित केलेले क्षेत्र वगळण्यासाठी लेखी आश्वासन शेतकऱ्यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुंबई, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सांगली आणि उपजिल्हाधिकारी भूसंपदान सोलापूर यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात बेकायदा आंदोलन केल्या प्रकरणी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आणि शेतकऱ्यांना पोलिसांनी रात्री उशिरा ताब्यात घेतले. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सदरबझार पोलिसात चालू होती. आंदोलन स्थळी मोठा बंदोबस्त असल्याने पोलीस छावणीचे स्वरूप आले होते.

आंदोलक शेतकऱ्यांशी आमदार बच्चू कडू यांनी मोबाईवरून संवाद साधला. क्षेत्र वगळण्यासाठी केली जाणारी प्रक्रिया शेतकऱ्यांना समजावून सांगितले. याला किमान एक महिन्याचा कालावधी लागणार असल्याचे सांगत आंदोलन मागे घेण्याची सूचना केली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



भारतीय सैन्यानी असंच माझ–तुझ केलं तर?

कल्याण
469-99-180

मेन बाजार
557-79-135

## फोटोसह व्हिडिओ व्हायरल करण्याची
# धमकी देऊन केला अत्याचार
### आरोपीला सहा दिवसांची पोलीस कोठडी

✔ सुराज्य/सोलापूर

ओळखीतून निर्माण झालेल्या प्रेम संबंधाचा गैरफायदा घेत तसेच आपत्ती जनक काढलेले पडित महिलेचे फोटो व व्हिडिओ व्हायरल करेन अशी वारंवार धमकी देऊन रोख ५ लाख १४ हजार रुपये तसेच २१७८ ग्रॅम सोने घेऊन ब्लॅकमेलिंग करत इच्छेविरुद्ध जबरदस्तीने तुळजापूर रोडवरील लॉजवर तसेच घरात बोलावून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी पूर्व भागातील गारमेंट व्यवसायिक श्रीधर श्रीनिवास रच्चा (वय-३२, दाजी पेठ, बालाजी मंदिराच्या पाठीमागे, सोलापूर) याच्यावर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यास ६ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

तक्रारदार पीडित महिला ही गृहिणी असून त्यांचा ज्वेलर्स चा व्यवसाय आहे.फेसबुक, इंस्टाग्रामवर ओळख वाढवत आरोपी यांनी ओळख वाढवली. ओळखीमुळे पीडित महिला ही आरोपीच्या घरी ये जा करत. पीडित महिलेची आर्थिक परिस्थिती सधन असल्याचा गैरफायदा घेत आरोपीने तिच्याकडे पैशाची मागणी केली. त्यानंतर त्याने त्या महिलेस लॉजवर नेऊन जबरदस्ती केली. २०१९ पासून ते ३० सप्टेंबर २२ या काळात आरोपीने पीडित महिलेचा गैरफायदा घेत तसेच आपत्ती जनक काढलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी देत तिच्याकडून वारंवार रोख स्वरूपात तसेच दागिनेच्या स्वरूपात फॅक्टरी टाकायची आहे.असे सांगून पैसे गोळा करत गेला. लॉकडाऊनच्या काळात ही त्याने त्या पीडित महिले कडून पैसे उकळले. पीडित महिलेने काही वेळेस हे पैसे तिच्या माहेरकडील लोकांकडून गोळा करून त्याच्या अकाउंटवर टाकत गेली. ६ सप्टेंबर रोजी पीडित महिलेच्या दिरास हे प्रकरण कळाले व त्यांनी त्या पीडित महिलेस धीर दिला.त्यानंतर पीडित महिलेने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात श्रीधर याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. आरोपीस सहा दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. अशी माहिती तपास अधिकारी दुय्यम पोलीस निरीक्षक देशमुख यांनी दिली.



### ■ आला संशय; फुटले बिंग

एके दिवशी पीडित महिलेच्या दिराने तिचा मोबाईल पाहिल्या नंतर तिचे आणि श्रीधर याच्यामध्ये झालेले संभाषण त्यांनी ऐकले.आणि या प्रकरणाचे बिंग फुटले.समाजात आपली बदनामी होईल म्हणून त्यांनी आपापसात मिटवण्याचा प्रयत्न केला.परंतु आरोपींनी ४० लाखाची मागणी केली.त्यामुळे पिडीतीने सरळ पोलिसाकडे धाव घेऊन गुन्हा दाखल केला आहे.

### ■ तब्बल दोन किलो उकळले सोने

पीडित महिलेच्या असहाय्यतेचा फायदा घेत आरोपीने त्या महिले कडून या दीड दोन वर्षात वेगवेगळी कारणे सांगून तब्बल दोन किलो सोन्याचे दागिने उकळले.त्यापैकी आतापर्यंत अर्धा किलो सोन्याचा मुद्देमाल हस्तगत केल्याचे तपास अधिकारी दु.पो.नि देशमुख यांनी सांगितले.


